
## नागपूर महानगरपालिका, नागपूर
## सार्वत्रिक निवडणूक २०१७



# मतदार जागृती
# कार्य अहवाल

मतदार जागृती

# कार्य अहवाल

## अनुक्रमणिका

१. जनजागृती अभियान................१

२. मतदार नोंदणी अभियान............२

३. घोषचित्र स्पर्धा.......................३

४. जनजागृतीचे फलक................४

५. आय विल वोट.......................६

६. वॉकॉथॉन स्पर्धा.....................७

७. सेल्फी आणि शपथ.................८

८. सार्वजनिक क्षेत्राचे योगदान........१०

९. हायटेक प्रचार रथ..................११

१०. सोशल मीडिया/रेडिओ............१२

११. वोटर्स आयकॉन....................१३

१२. तुलनात्मक मतदान................१४

१३. अपेक्षित टक्का का नाही?........१५

१४. उपाय..................................१७



# मनोगत

निवडणूक कोणतीही असो, ती प्रशासनासाठी आव्हान असते. नागपूर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक हे महानगरपालिका प्रशासनासाठी आव्हानच होते. निवडणुकीचा दिवस जरी एक असतो आणि निवडणूक घोषित झाल्यानंतर प्रक्रिया जरी २० दिवस चालत असते तरी या संपूर्ण तयारीला त्यासाठी आवश्यक असलेले विविध टप्पे पार पाडण्यासाठी संपूर्ण यंत्रणा सुमारे वर्षभर अगोदरपासून कामाला लागलेली असते. निवडणूक आहे म्हटले की, मतदान यादी अद्ययावत करणे, नवीन मतदार नोंदणीसाठी विविध स्तरावर मोहिमा आखणे, त्याची अंमलबजावणी करणे, मतदारांमध्ये नाव नोंदणी करण्यापासून ते मतदान करण्यासाठी बाध्य करणे इथपर्यंत जनजागृतीचे अभियान हाती घ्यावे लागते.

या सर्वच स्तरावर नागपूर महानगरपालिका प्रशासनाने कठोर मेहनत घेतली. अगदी जन्म–मृत्यू विभागातील नोंदी निवडणूक विभागाला पोहचविण्यापासून ते मतदार जनजागृतीचे अभिनव अभियान राबविण्यापर्यंत सर्वच स्तरावर यंत्रणेने केलेले काम वाखाणण्याजोगे आहे.

एकीकडे निवडणूक विभाग निवडणुकीशी संबंधित संपूर्ण तांत्रिक बाबींचे काम पूर्ण करीत असताना दुसरीकडे यंत्रणेतील एक भाग मतदार जनजागृतीवर भर देत होता. आठ ते दहा महिन्यांपूर्वी नवीन मतदार नोंदणीने अभियानाला सुरुवात झाली. अभिनव स्पर्धा, महाविद्यालयांमध्ये आणि झोनस्तरावर नोंदणी केंद्रे यासोबतच जनजागृतीच्या मोहिमेत सर्वांना सहभागी करून घेण्यात आले.

‘आय विल वोट’ हे स्वतंत्र अभियान मतदार जनजागृतीसाठी नागपूर महानगरपालिकेने राबविले. या अभियानात सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. प्रत्येक उपक्रमाला सोशल मीडियावरून वायरल करून प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न झाला. अगदी मतदानाच्या अखेरच्या दिवशी मतदारांना मतदान केंद्राकडे नेण्यासाठी ‘वोटर्स आयकॉन’ ही अभिनव संकल्पना सोशल मीडियावरून राबविण्यात आली. या सर्व मोहिमांना उदंड प्रतिसाद लाभला.

या सर्व उपक्रमांमुळे मतदानाच्या टक्केवारीत मागील निवडणुकीच्या तुलनेत सुमारे आठ ते १० टक्क्यांनी वाढ होईल, अशी अपेक्षा होती. परंतु अनपेक्षितपणे केवळ मतदानाच्या टक्केवारीत दीड ते दोन टक्क्यांनी वाढ झाली. त्याला अनेक कारणे असू शकतील. या सर्व कारणांचा शोध घेणे सुरू केले आहेत. त्यातील प्रामुख्याने जी काही कारणे समोर आली आहेत, ती या पुस्तिकेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जी काही कारणे टक्केवारी वाढू न शकण्यास कारणीभूत ठरली त्या कारणांवर पुढील निवडणुकीत नक्कीच भर देऊन उपाययोजना करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त करतो.

**श्रावण हर्डीकर**
आयुक्त
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

## जनजागृती अभियान

नागपूर महानगरपालिकेने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी पारंपरिक जनजागृती पद्धतीचा अवलंब न करता ‘हाय टेक’ पद्धतीचा वापर केला. सोशल मीडियाचा वापर करीत ‘आय विल वोट’ या नावाने मतदार जनजागृती अभियानाचे ‘ब्रॅण्डींग’ झाले. जे मतदारांना अपील झाले. स्वतंत्र नावाने जनजागृती अभियान राबविणारी नागपूर महानगरपालिका ही राज्यात प्रथम ठरली.

सन २०१७ च्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी नागपूर महानगरपालिकेने तीन टप्प्यात मतदार जनजागृती अभियान राबविले

**टप्पा एक** — मतदार नोंदणी आणि त्यासाठी जनजागृती

**टप्पा दोन** — प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहचून मतदान करण्याचे आवाहन

**टप्पा तीन** — मतदानाच्या दिवशी शाई लावलेल्या बोटाचा ‘सेल्फी’ पाठविण्याचे आवाहन



## मतदार नोंदणी अभियान

सन २०१७ मध्ये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका होणार असल्यामुळे मतदार यादी अद्ययावत करणे, त्यातील हयात नसलेल्या व्यक्तींची नावे गाळणे आणि नवमतदार नोंदणी करणे हा कार्यक्रम महानगरपालिका प्रशासनाने जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने हाती घेतला. एकीकडे प्रशासकीय स्तरावर सन २०१२ ते २०१६ या कालावधीत मृत्यू पावलेल्या नागरिकांची यादी जन्म-मृत्यू विभागामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागाला उपलब्ध करून देण्यात आली. तर दुसरीकडे वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या आणि मतदानाचा अधिकार प्राप्त झालेल्या युवा वर्गाची मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली. मतदार यादीत नाव नोंदवावे यासाठी विविध स्तरावर जनजागृती आणि केवळ महापालिका किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातच नव्हे तर महाविद्यालये, विविध झोनमधील शाळा, झोन कार्यालय आदी ठिकाणी मतदार नोंदणीची व्यवस्था करण्यात आली. नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत फेसबुक पेजवर मतदार नोंदणीबाबत जनजागृती करण्यात आली. व्हॉटस्प, ट्विटर, फेसबुक, यूट्यूब आदींवर मा. आयुक्तांनी केलेल्या आवाहनाची क्लिप व्हायरल करण्यात आली. सुमारे २० लाख लोकांना बल्क एसएमएसच्या माध्यमातून मतदार नोंदणीचे आवाहन करण्यात आले. परिणामत: एक लाख ८० हजार नव्या मतदारांची यंदाच्या निवडणुकीसाठी मतदार यादीत भर पडली.

- वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवांची यादी तसेच सन २०१२ ते २०१६ या कालावधीत मृत्यू पावलेल्या नागरिकांची यादी महापालिकेच्या जन्म-मृत्यू विभागामार्फत उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयाला सीडी स्वरूपात उपलब्ध करून दिली.
- १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याच्या सूचना देण्यासाठी शहरातील विविध महाविद्यालयातील प्राचार्यांची बैठक
- प्रत्येक महाविद्यालयाने एक नोडल अधिकारी नेमून नोंदणी करण्याच्या सूचना
- मनपातर्फे नमुना क्र. ६, ७, ८, ८अ वाटप आणि स्वीकृती करण्याकरिता झोन कार्यालय, महाविद्यालये पकडून एकूण १८१० मतदार नोंदणी व स्वीकृती केंद्र उघडण्यात आले.
- http://www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावरही फॉर्म उपलब्ध करून देण्यात आले.
- गणेशोत्सव आणि दुर्गोत्सवात मतदार नोंदणीचे आवाहन करणारे फ्लेक्स सार्वजनिक मंडळातर्फे लावण्यात आलेत.
- मनपा आयुक्तांनी केलेल्या आवाहनाच्या व्हिडीओ क्लिप्सही उत्सवादरम्यान विविध ठिकाणी दाखविण्यात आल्या.
- नागपूर महापालिकेच्या शहर बसेसवर तसेच कनक रिसोर्सेसच्या कचरा गाड्यांवर सदर फ्लेक्स लावण्यात आले.
- सहकारी गृहनिर्माण संस्थांनाही फ्लेक्स उपलब्ध करून देण्यात आले.
- बँक व्यवस्थापकांची बैठक घेऊन बँकांमधूनही फ्लेक्स द्वारे जनजागृती करण्यात आली.





## घोषचित्र स्पर्धा

- ३२ स्पर्धकांचा सहभाग
- विजेते निवडण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने मतदान
- ऑनलाईन पद्धतीने निवड झालेल्या चित्रांचा मतदार नोंदणी मतदार जनजागृती अभियानात वापर.
- संपूर्ण चित्रांचे महापालिकेच्या सभागृहात प्रदर्शन



## जनजागृतीचे फलक

मतदार नोंदणी जनजागृतीअंतर्गत विविध संस्थांच्या, अधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत फलक घेऊन सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करण्यात आली. पथनाट्यातून मतदारांना हक्काविषयी जागरुक करण्यात आले. घरगुती सिलिंडरवर मतदार नोंदणीचे स्टीकर लावून घरोघरी मोहिमेची माहिती पोहचविण्यात आली. घराघरातून कचरा जमा करणाऱ्या कचऱ्यागाड्यांवर फ्लेक्स लावून लोकांपर्यंत संदेश पोहचविण्यात आला. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात मतदार यादीत नाव नोंदण्यासंदर्भातील फलकं लावून जनजागृती करण्यात आली. गणेश विसर्जनाच्या वेळी निर्माल्य संकलनासोबतच महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. शाळेच्याच विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती रॅली काढून मतदार यादीत नाव नोंदविण्यासंदर्भात जनजागृती केली. विविध ठिकाणी महिला बचत गटांच्या बैठका घेण्यात आल्यात. त्यांच्या माध्यमातून संबंधित गटाच्या परिसरात जनजागृती करण्यात आली. त्याची ही सचित्र झलक.



## जनजागृती



## क्रियेटीव्ह












# आय विल वोट

मतदान हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. घटनेने दिलेल्या या अधिकाराचा वापर करताना मात्रा नागरिक दिरंगाई करतात. योग्य लोकप्रतिनिधी निवडून दिला तर शहराचा पर्यायाने देशाचा विकास योग्य प्रकारे होईल. आणि हे शक्य करून दाखवायचे असेल तर मतदान करणे गरजेचे आहे. यासाठी हा अधिकार काय आहे आणि यामुळे काय किमया होऊ शकते, हे युवा वर्गाला पटवून देण्यासाठी आणि जनजागरणासोबतच मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महापालिकेच्या पुढाकारातून राबविण्यात येणारे अभियान म्हणजे 'आय विल वोट!'

## काय आहे मोहीम?

नागपूर महानगर पालिकेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सदर उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयीन विद्यार्थी आणि सामान्य मतदार हा या उपक्रमांतर्गत जनजागरणासाठी केंद्रबिंदू होता. यंदाच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान करून आपआपल्या प्रभागातील नेतृत्व निवडावे, ही या मागील संकल्पना होती. या मोहिमेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भावनिक आवाहन करण्यात आले. स्मार्ट सिटी प्रकल्प लक्षात ठेवून 'स्मार्ट सिटी-स्मार्ट मतदार' असे घोषवाक्यही या उपक्रमाद्वारे पुढे करण्यात आले. नागपूर शहरातील अधिकाधिक महाविद्यालयात आणि सार्वजनिक ठिकाणी या मोहिमेच्या माध्यमातून पोहचण्यात यश आले.

## मोहिमेचे उद्दिष्ट

महानगर पालिका निवडणुकीत युवा वर्गाला मतदानासाठी उद्युक्त करणे, मतदानाविषयी जनजागरण करणे, निवडणुकीत युवांचा सहभाग वाढविणे आणि उच्चभ्रू वस्तीतील लोकांनी मतदानाचा दिवस हा 'पिकनिक डे' म्हणून साजरा न करता राष्ट्रीय कर्तव्यात सहभाग दाखविण्याचा दिवस आहे, अशी भावना त्यांच्यात निर्माण करणे, हे या अभियानाचे उद्दिष्ट होते. सर्व महापालिकेच्या यंत्रणेने प्रत्येक घटकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न या मोहिमेच्या माध्यमातून करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

# वॉकॉथॉन स्पर्धा

'आय विल वोट' अंतर्गत मतदार जनजागृती अभियानाचा 'वाकॉथॉन स्पर्धे'च्या निमित्ताने औपचारिक शुभारंभ करण्यात आला. सुमारे १० हजारांवर नागपूरकरांचा या स्पर्धेत सहभाग होता. कार्यक्रमस्थळी नागपूर मनपाचा विशेष 'हायटेक' स्टॉल लावण्यात आला होता. या स्टॉलवर इव्हीएम मशीन वापराबाबत एलईडी स्क्रीनवरून मार्गदर्शन करण्यात येत होते. मतदान कसे करायचे याबाबत प्रत्यक्ष ईव्हीएम समोर ठेवून प्रात्यक्षिक करून दाखविण्यात येत होते. वॉकॉथॉन स्पर्धेच्या ठिकाणी मनपाने 'सेल्फी प्वॉईंट' उभारला. वॉकॉथॉन स्पर्धेत सहभागी झालेले स्पर्धक या 'सेल्फी प्वॉईंट'वर सेल्फी घेत होते.'सेल्फी प्वॉईंट'वर घेतलेले सेल्फी मनपाच्या अधिकृत फेसबुक पेजवर टाकण्यात आले. यामुळे मनपाच्या अधिकृत फेसबुक पेजच्या फालोअर्सच्या संख्येत वाढ झाली. याच ठिकाणी सुमारे १० हजार नागरिकांना मनपातर्फे मतदाना करण्याची शपथ देण्यात आली. 'मी मतदान करीन आणि इतरांनाही मतदानासाठी प्रेरीत करेन' अशी उत्साहाने लोकांनी शपथ घेतली.














# सेल्फी आणि शपथ

मतदानाचे महत्त्व सांगणे, अधिकाराविषयी जागरुक करणे, मनपाने उभारलेल्या सेल्फी प्वाईंटसमोर सेल्फी काढणे आणि त्यानंतर मतदानाची शपथ देणे, घेतलेले सेल्फी मनपाच्या अधिकृत फेसबुक पेजवर अपलोड करून अधिकाधिक लोकांपर्यंत संदेश पोहचविण्याचा प्रयत्न करणे, असे एकंदर स्वरूप 'आय विल वोट' या अभियानाचे होते.

'आय विल वोट' अभियानाअंतर्गत शहरातील विविध महाविद्यालयात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रथम मतदान करणाऱ्या युवा वर्गाचा टक्का वाढविण्यासाठी हा यशस्वी प्रयत्न ठरला. प्रत्येक महाविद्यालयात 'सेल्फी प्वॉईंट' तयार करण्यात आले. त्यासमोर विद्यार्थ्यांनी उत्साहाने आवर्जून 'सेल्फी' काढलेत. त्यांना महानगरपालिकेच्या अधिकृत फेसबुक पेजविषयी माहिती देऊन त्यांचे सेल्फी त्या पेजवर बघण्यास सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या अखेरीस मतदानाची शपथ प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात आली. या अभियानाने प्रेरीत होऊन अनेक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसराच्या वस्त्यांमध्ये मतदानाविषयी जनजागृती केली.
'आय विल वोट' अभियानांतर्गत शहरातील सार्वजनिक ठिकाणी प्रत्यक्ष ईव्हीएम मशीन ठेवून नागरिकांना 'मतदान कसे करायचे' याबाबत माहिती देण्यात आली. फुटाळा, महाराजबाग, शहरातील सर्व मॉल्स याशिवाय अन्य सार्वजनिक ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. या सार्वजनिक ठिकाणीही 'सेल्फी प्वॉईंट' उभारण्यात आले होते. 'सेल्फी प्वॉईंट'वर काढलेली छायाचित्रे नागपूर महानगरपालिकेच्या सोशल मीडिया साईटस्वर अपलोड करण्यात आलीत. 'मतदान कसे करायचे' याबाबत माहिती असलेले पत्रकं सार्वजनिक ठिकाणी वाटण्यात आलेत.



# सेल्फी आणि शपथ



# सार्वजनिक क्षेत्राचे योगदान

सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सहकारी संस्था, रेल्वे मंडळ, बँका, मेडिकल असोशिएशन, हॉटेल्स असोशिएशन्स, नागपूर विद्यापीठ,प्रादेशिक परिवहन विभाग, शिक्षणाधिकारी कार्यालय, समाजसेवी संस्था आदींच्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन मतदार जनजागृती अभियानात सहभागी होण्याचे आवाहन मनपा प्रशासनातर्फे करण्यात आले. या आवाहनाला दाद देत रेल्वे स्थानकावर असलेल्या एलईडी स्क्रीनवर, बँकांमधील एटीएमवर ‘मतदान करा’, असे आवाहन करणाऱ्या क्लिप्स दाखविण्यात आल्या. विविध सहकारी सोसायट्यांमध्ये बॅनर्स लावण्यात आलेत.

## बचत गटांचा सहभाग

‘आय विल वोट’ अभियानांतर्गत समाजकल्याण विभागाच्या वतीने दहाही झोनमधील समुदाय संघटक, महिला बचत गटाद्वारे वस्तीपातळीवर जनजागृती करण्यात आली. या बचत गटांच्या बैठका घेण्यात आल्यात. समाजकल्याण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या या बैठकांमध्ये मनपाचे अधिकारी उपस्थित राहायचे. ‘मतदान का आणि कसे करायचे’ याबाबत अधिकारी त्यांना मार्गदर्शन करीत होते. या बैठकांनंतर बचत गटाच्या महिलाही निवडणूक जनजागृती अभियानाच्या ब्रॅण्ड ॲम्बेसिडर बनल्या. बचत गटांच्या महिलांनी त्यांच्या परिसरात मतदार जनजागृतीमध्ये महत्त्वाची भूमिका निभावली. समाजकल्याण विभाग NULM अंतर्गत कौशल्य प्रशिक्षण संस्थांमार्फत मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले.



# ‘हायटेक’ प्रचार रथ

‘आय विल वोट’ अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या दहाही झोनमध्ये ‘हायटेक’ प्रचार रथ फिरविण्यात आला. रथावर असलेल्या एलईडी स्क्रीनवर आयुक्तांचे आवाहन, ईव्हीएम मशीनचा वापर याबाबत माहिती देण्यात आली. याच रथावर ‘डमी ईव्हीएम मशीन’ ठेवण्यात आल्या होत्या. नागरिकांना ईव्हीएम मशीनचा प्रत्यक्ष वापर कसा करायचा, याबाबत मनपा कर्मचाऱ्यांनी माहिती दिली.

## चित्रफीत झाली व्हायरल

‘आय विल वोट’ अभियानांतर्गत मतदान कसे करायचे याबाबतचे विविध व्हिडीओ तयार करून फेसबुक, व्हॉटसप वरून वायरल करण्यात आले. निवडणुकीशी संबंधित सर्वच व्हिडीओ नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यातील जनजागृतीच्या अखेरच्या १० दिवसांत मतदारांना यादीत नाव कसे शोधायचे याबाबत माहिती देण्यात आली. True Voter app यासह महानगरपालिकेच्या लिंक sms द्वारे नागरिकांना पाठविण्यात आल्या. फेसबुकवर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. व्हॉटस् ॲपवरही याबाबतची माहिती व्हायरल करण्यात आली.






# सोशल मीडिया, रेडिओ

मतदानाचे आवाहन, मतदार यादीत नाव कसे शोधायचे, आचारसंहिता भंगाची तक्रार कशी करायची याबाबत लिंकसह सुमारे १८ लाख ८५ हजार संदेश नागपूरकरांना पाठविण्यात आले.


मतदानाचे आवाहन करणारे विविध क्रिएटीव्ह मतदार जनजागृती अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात फेसबुकवर प्रत्येक दिवशी टाकण्यात आले. हजारो लोकांनी ते शेअर केलेत त्यामाध्यमातून ते लाखो लोकांपर्यंत पोहचण्यास मदत झाली.

'आय विल वोट' अभियानाअंतर्गत होणाऱ्या सर्व कार्यक्रमाची माहिती, निवडणुकीचे अपडेट, निवडणूक विभागातर्फे वेळोवेळी उमेदवारांसाठी आणि मतदारांसाठी येणाऱ्या सूचना आदींबाबत सोशल मीडियावरून विशेष प्रसिद्धी देण्यात आली.

## रेडिओ जिंगल्स

दृक्-श्राव्य आणि नभोवाणी या माध्यमांचाही वापर मतदानाचे आवाहन करण्यासाठी करण्यात आला. नागपूर शहरातील चार एफ.एम. चॅनलवरून मतदानाचे आवाहन, मतदार यादीत नाव शोधणे, आचारसंहिता भंगाची तक्रार करण्यासाठी प आदीविषयी निरनिराळ्या जिंगल्स तयार करून प्रसारीत करण्यात आल्यात. मा. महापालिका आयुक्तांनी केलेले आवाहनही एफ.एम. वरून प्रसारीत करण्यात आले.

स्थानिक वृत्तवाहिन्यांनी नागपूर महानगरपालिकेच्या 'आय विल वोट' अभियानाची दखल घेतली. यासंदर्भात विशेष वृत्तांत तयार करून स्थानिक वाहिन्यांनी प्रसारीत केला.






## वोटर्स ऑयकॉन


मतदानाचा टक्का वाढावा यासाठीचा नागपूर महानगरपालिकेचा प्रयत्न मतदानाच्या दिवशीही सुरू होता. मतदारांनी मतदान केल्यानंतर शाई लावलेल्या बोटासह सेल्फी पाठवा, असे आवाहन एका रात्रीतून व्हॉटस ॲप वरून व्हायरल करण्यात आले. २१ फेब्रुवारीला सकाळी ७.३० पासून सेल्फी येणे सुरू झाले. रात्री १० वाजतापर्यंत सेल्फी नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आलेत. विशेष म्हणजे सेल्फी अपलोड केल्यानंतर संबंधित मतदारांना व्हॉटस ॲपच्या माध्यमातून धन्यवादही पाठविण्यात आले. या दिवशी फेसबुकच्या फॉलोअर्सच्या संख्येत सुमारे दोन हजारांनी वाढ झाली.मतदार जागृती अभियानातील 'वोटर्स ऑयकॉन'च्या निमित्ताने अखेरचा प्रयोग आणि उपक्रम राबविण्यात आला.'आय विल वोट'च्या निमित्ताने जितके उपक्रम एक महिन्याच्या कालावधीत राबविण्यात आले त्या प्रत्येक उपक्रमाला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. स्वतंत्र नावाने राबविलेले जनजागृती अभियान हे अल्पावधीत चर्चेचे झाले.



# तुलनात्मक मतदान

| नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१२ | | |
|---|---|---|
| एकूण मतदार | महिला | पुरुष |
| १९८६०५७ | ९६३२९४ | १०२२७६३ |
| प्रत्यक्ष मतदान | | |
| १०३२७६० | ५४४६१६ | ४८८१४४ |
| ५२% | ५३.२४% | ५०.६७% |

| नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१७ | | |
|---|---|---|
| एकूण मतदार | महिला | पुरुष |
| २०९३३२९ | १०२२४०१ | १०७०९२८ |
| प्रत्यक्ष मतदान | | |
| ११२४६३१ | ५३४३५८ | ५९०२७३ |
| ५३.७२ | ५२.२६ | ५५.११ |
| वाढलेले मतदार | | |
| १०७२७२ | ५९१०७ | ४८१६५ |
| प्रत्यक्ष वाढीव मतदान | | |
| ९१८७१ | ४६२१४ | ४५६५७ |
| १.७२ | १.५९ | १.८७ |



# अपेक्षित टक्का का नाही?

## अद्ययावत मतदार यादीचा अभाव

सन २०१२ च्या निवडणुकीत १९ लाख ८६ हजार ५७ मतदारांपैकी केवळ १० लाख ३२ हजार ७६० मतदारांनी मतदान केले. ही टक्केवारी केवळ ५२ इतकी होती. सन २१०७ च्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मनपा प्रशासनाने कंबर कसली होती. एकीकडे नवीन मतदारांची नोंदणी करताना दुसरीकडे जुन्या यादीतील जे मतदार हयात नाहीत त्यांची नावे गाळणे आवश्यक होती. शिवाय पाच वर्षांच्या काळात अनेक मतदार नागपुरातून अन्यत्र गेलेत. ती नावे गाळणे सुद्धा आवश्यक होती. यासाठी मतदार यादीचे सर्वेक्षण होणे आवश्यक होते.
यापैकी नागपूर महानगरपालिकेने जन्म-मृत्यू विभागातून मागील पाच वर्षात मृत पावलेल्या व्यक्तींची यादी जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक विभागाकडे सोपविली होती. त्यावर काम होणे आवश्यक होते. मात्र, या यादीवर काम झाल्याचे दिसून येत नाही. काम न झाल्याने हयात नसलेल्या व्यक्तींचे नावे मतदार यादीत कायम राहिलीत.
दुसरीकडे सर्वेक्षण आवश्यक होते. मात्र, सर्वेक्षण झाले नाहीत. सर्वेक्षण न झाल्याने जी व्यक्ती नागपूर सोडून इतर शहरात गेलीत, त्यांचीही नावे यादीत कायम राहिलीत. विवाह झालेल्या अनेक मुलींची नावे यादीत माहेर आणि सासरच्या नावाने अर्थात दोन-दोन ठिकाणी असल्याचेही निदर्शनास आले आहे.
नव्या मतदारांची नोंदणी मात्र होत गेली. यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत एक लाख सात हजार २७२ मतदारांची वाढ यंदाच्या निवडणुकीसाठी मतदार यादीत झाली. अर्थात मागील निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या निवडणुकीसाठी सहा टक्क्यांनी मतदारांमध्ये वाढ झाली. जर हयात नसलेल्या व्यक्तींची नावे आणि नागपूर सोडून इतरत्र गेलेल्या व्यक्तींची नावे जुन्या यादीतून वगळली असती तर कदाचित मतदारांची संख्या कमी झाली असती.
दोन्ही प्रकारामध्ये मोडणाऱ्या व्यक्तींची नावे मतदार यादीतून वगळली असती तर यंदाच्या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी वाढलेली आढळली असती.

निष्कर्ष : अद्ययावत मतदार यादीच्या अभावामुळे मतदानाची टक्केवारी वाढलेली दिसत नाही.

## दूरचे मतदान केंद्र

नवीन प्रभाग पद्धतीनुसार एका प्रभागाचा परिसर विस्तारला. प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी अनेकांना त्यांना घरापासून लांब मतदान केंद्रावर मतदान करायचे होते. जनजागृतीनंतरही मात्र सुशिक्षित नागरिकांच्या परिसरामध्ये दूरवरच्या मतदान केंद्रावर केवळ मतदानासाठी जाण्यास उदासीनता दिसून आली. मनपा प्रशासन वोटर स्लीप प्रत्येक घरापर्यंत पोहचविण्यात कमी पडले. वेळेअभावी शंभर टक्के घरी स्लीप पोहचू शकल्या नाहीत.
उत्साहाने मतदान करायला गेले त्यांच्याजवळ मतदार ओळखपत्र असतानाही यादीत नाव नसल्याचे लक्षात आले. यादी, प असे सर्वच ठिकाणी शोधूनही नाव न सापडणाऱ्यांची संख्या मोठी होती. त्यामुळे अशा व्यक्तींना मतदानापासून वंचित राहावे लागले.
निष्कर्ष : सोयीनुसार किंवा घराजवळ नसलेले मतदान केंद्र यामुळे टक्केवारीवर परिणाम पडला.

## सुशिक्षितांमध्येच उदासीनता

सुशिक्षीत नागरिकांची वस्ती असलेल्या धरमपेठ, लक्ष्मीनगर आणि धंतोली झोनमध्ये मतदारांमध्ये उदासीनता दिसून आली. विशेष म्हणजे जनजागृती अभियानादरम्यान या झोनवर अधिक भर देण्यात आला होता. ह्या तीनही झोनअंतर्गत येणारा परिसर मार्केट परिसर आणि सुशिक्षितांची वस्ती असलेला परिसर आहे. याच वर्गात नेमकी उदासीनता का, या मागची नेमकी कारणे अद्यापही कळली नाही. त्याउलट दाट वस्ती आणि मध्यमवर्गीयांची वस्ती असलेल्या इतर झोनमध्ये मतदानाची टक्केवारी ही उत्तम आहे. केवळ तीन झोनमधील मतदानाच्या कमी टक्केवारीमुळे एकूण टक्केवारीवर परिणाम पडला.

निष्कर्ष : सुशिक्षितांची वस्ती असलेल्या तीन झोनमुळे मतदानाची एकूण टक्केवारी घसरली.

## नवीन मतदारांचे ओळखपत्र

युवांचा मतदानातील टक्का वाढावा यासाठी महाविद्यालयात मोठ्या प्रमाणावर जनजागृती अभियान राबविण्यात आले. मात्र, या अभियानादरम्यान अनेकांनी नाव नोंदणी केल्यानंतरही मतदार यादीत नाव समाविष्ट झाले नसल्याची खंत व्यक्त करुन दाखविली. अनेकांना वेळेत ओळखपत्र प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे ओळखपत्राविना मतदान करता येणार नाही, असे समजून अनेकांनी यादीत नाव येऊनही मतदान केले नाही.

निष्कर्ष : युवा मतदार आणि निवडणूक विभाग यामध्ये सुसंवाद नसल्याचे जाणवले.






## उपाय

भविष्यात मतदान वाढीसाठी खालील उपाय करता येतील.

- ज्या तीन झोनमध्ये सातत्याने मतदान कमी होते तेथील मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यासाठी वेगळा आराखडा तयार करण्यावर भर देण्यात येईल.

- मतदारांना त्यांच्या सोयीनुसार घराजवळचे मतदान केंद्र मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार सोय करण्यासंदर्भात आराखडा तयार करु.

- अशा परिसरातील मॉल, थिएटर व अन्य व्यापारी केंद्रात मतदान करणाऱ्या व्यक्तींना सवलतीच्या दरात खरेदी करता येईल, अशी काही योजना आखण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

- महाविद्यालयाने १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची यादी निवडणूक विभागाकडे सोपवावी. १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी करण्यास बाध्य करावे. अन्यथा प्रवेश नाकारण्यात यावा. निवडणूक विभागाकडे यादी दिल्यानंतर त्याचा पाठपुरावा महाविद्यालयांनी करावा.

- शहरातील धार्मिक स्थळे, धर्मगुरु, व्यापारी असोशिएशन, लेडीज क्लब, स्वयंसेवी संस्था आणि अन्य महत्वाचे समूह ज्यांच्यातील नेतृत्वाचा त्या समूहावर परिणाम पडतो, अशा व्यक्तींकडून मतदान कमी होण्याची नेमकी कारणे काय, हे जाणून घेण्यात येईल. त्यानंतर त्यादृष्टीने उपाययोजना आखण्यात येतील.

- मतदार ओळखपत्र आधार कार्डशी लिंक करता येईल का, याबाबत विचार करता येईल.

- मतदार नाव नोंदणी केंद्र वर्षभर सुरू ठेवल्यास नवमतदारांना कधीही नोंदणी करणे सोयीचे होईल.

- मतदार जनजागृती अभियान हे केवळ निवडणूक काळापुरते मर्यादित न ठेवता कायमस्वरूपी सुरू ठेवल्यास त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल.

- यंदाच्या निवडणुकीत इतर महानगरपालिकांनी जनजागृतीसाठी अंमलात आणलेले काही चांगले उपक्रम पुढील काळात नक्की राबविण्यात येतील.